<u>महाराष्ट्र शासनाचे ई-प्रशासन धोरण</u>

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.मातंस २०११/प्र.क्र १२५/३९**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दि. २३ सप्टेंबर, २०११**

**प्रस्तावना :-**

माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामान्य जनतेस शासनाच्या सर्व सेवा माफक दरात प्रभावी, पारदर्शक रित्या व जलदगतीने दयावयाच्या आहेत. सत्तारुढ पक्षाच्या संयुक्त जाहिरनाम्यात शासकीय सेवा एकत्रित रित्या पुरविण्याबाबत अभिवचन देण्यात आले आहे. राज्याच्या विविध विभागांमार्फत ई-प्रशासन प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये एकसुत्रता, एकरूपता व सुसंगतपणा असणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेता ई-प्रशासन धोरणाचा मसूदा तयार करण्यासाठी डॉ. विजय भटकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने तयार केलेल्या ई-प्रशासन धोरणा बाबतचा मसुदा शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमाद्वारे शासन सेवा जनतेला माफक दरात पुरविण्याबाबत महाराष्ट्र राज्याच्या ई-प्रशासन धोरणावर पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

## ई-प्रशासन धोरण २०११

**१. प्रस्तावना:**

१.१ महाराष्ट्र शासन भारतात ई-प्रशासन व माहिती आणि संगणक तंत्रज्ञानाचा पाया रचणाऱ्यांपैकी एक आहे.

१.२ महाराष्ट्र शासन नागरिकांच्या गरजा आणि उत्तम प्रतीची सेवा पुरवणाऱ्या ई-प्रशासन बाबतचे कार्यक्रम राबविण्यात आघाडीवर आहे.

१.३ अधिकाधिक पारदर्शकता आणि प्रशासन प्रक्रियेबाबतची माहिती मिळण्याची सुलभता या गोष्टींवर राज्याच्या ई-प्रशासनाचा मुख्य भर राहिला आहे.

१.४ हे धोरण म्हणजे राज्यातील ई-प्रशासनाचा अधिक विकास करण्यासाठीचे पुढचे पाऊल आहे.

## २. व्हिजन आणि उद्दिष्टे

२.१ ई-प्रशासन क्षेत्रात राज्य करीत असलेले नेतृत्व कायम राखण्यासाठी व ते अधिक समर्थ

होण्यासाठी तसेच एम (मोबाईल) प्रशासनाकडे राज्याची वाटचाल करणे हे धोरणाचे उद्दिष्ट आहे.

२.२ नागरिकांना विविध सेवा ऑनलाईन पध्दतीने शासकीय कार्यालयात न जाता त्यांना नजिकच्या ठिकाणी कमीतकमी दरात पुरविण्यासाठी हे धोरण दिशा ठरवेल.

२.३ शासनाचे कामकाज अधिक कार्यक्षमपणे आणि कागदरहीत करणे हे या धोरणामूळे शक्य होणार आहे.

## ३. धोरणाची व्याप्ती

३.१ हे धोरण महाराष्ट्रातील अशा सर्व संस्थांना लागू होईल ज्या केंद्र अथवा राज्य शासनाच्या कायद्यानुसार स्थापन केलेल्या असतील, आणि अशा संस्था ज्यांच्या रचनेत आणि प्रशासनात मुख्यत: सरकारचे नियंत्रण असेल, किंवा केंद्र अथवा राज्य शासनाच्या मालकीच्या असतील किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असतील. खालील संस्थांना हे धोरण मार्गदर्शक स्वरुपात लागू राहिल- ज्यांना राज्य शासनाकडून कोणत्याही स्वरुपातील प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत मिळत असेल (या मदतीमध्ये सवलतीच्या दराने मिळणारी जमीन आणि करामधील सवलत इत्यादी तसेच शासनाने वेळोवेळी जाहीर केलेली मदत या बाबींचा समावेश असेल) किंवा अशा संस्था ज्यांचे कार्य सार्वजनिक स्वरुपाचे अथवा हिताचे असेल किंवा अशा संस्था ज्यांचे पदाधिकारी शासनाकडून नेमलेले असतील.

३.२ हे धोरण राज्य शासन समाविष्ट असलेल्या भागीदार असलेल्या किंवा संयुक्त संस्था स्थापन केलेल्या कंपन्यांनाही लागू असेल.

## ४.० उद्दिष्ट विधान-

४.१ शासनाच्या विविध विभागांनी पुढाकार घेऊन त्या विभागात ई-प्रशासनाची अंमलबजावणी करण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेतले आहेत.

४.२ शिवाय प्रत्येक विभागाने ई-प्रशासनाबाबत व्हिजन निश्चित केले आहे.

४.३ अशा विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे आणि त्यांनी परस्पर सहचर्याने काम करावे असे एकात्मिक पर्यावरण निर्माण करणे, ज्याद्वारे शासनाकडून नागरिकांना, सरकारकडून व्यवसाय क्षेत्राला आणि शासनाच्या विविध खात्यात एकामेकांना दिल्या जाणा-या शासनाकडून त्यांच्या कर्मचा-यांना सर्व सेवा कमीत कमी खर्चात आणि विनाअडथळा सलग स्वरुपात देता याव्यात म्हणून हे ई-प्रशासन धोरण तयार केले आहे.

४.४ हे धोरण राज्यात ई-प्रशासन यंत्रणा (System) आणि उपयोजित कार्यक्रमांची (Applications) निर्मिती आणि अंमलबजावणी करण्यासाठीची चौकट तयार करेल.

४.५ शासनाच्या विविध विभागातील महत्वाच्या कर्मचारी वर्गात बदल झाला तरी ई-प्रशासनाचा हेतू आणि निर्धारित दिशेने अंमलबजावणी पूर्वीप्रमाणेच चालू रहावी म्हणून हे धोरण याबाबत एक यंत्रणा निर्माण करेल.

४.६ हे धोरण नागरिकांना शासनाकडून स्वत:हून सेवा देता याव्यात यासाठी विविध विभागांना चालना देण्याचे काम करेल.

४.७ शासनाच्या धोरण ठरविण्याच्या प्रक्रियेत जनतेचा अधिक सहभाग मिळविण्यासाठीची पध्दत हे धोरण तयार करेल.

## ५ युआयडीचा वापर

५.१ योग्य लाभार्थ्यांना आवश्यक सेवा मिळण्यासाठी जे ई-प्रशासनाचे प्रकल्प हाती घेतले जातील त्या प्रकल्पांमध्ये युआयडी चा वापर कालबध्द पध्दतीने करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. विभागाची प्रकल्प अंमलबजावणी समिती/ उच्चाधिकार समिती प्रत्येक प्रकल्प मंजूर करतांना तो युआयडीशी संलग्न असल्याची खात्री करेल.

५.२ विभागांकडून वेगवेगळ्या योजनांसाठी देण्यात येणाऱ्या सेवासुविधांकरिता विविध प्रकारची ओळखपत्रे / स्मार्ट कार्डस यांचा वापर टाळून बायोमेट्रीक ओळख पध्दतीवर आधारीत युआयडी क्रमांकाचा वापर करुन सेवा पूरविण्यात येतील.

## ६. ई-प्रशासनाच्या अंमलबजावणीत मराठीचा वापर.

६.१ राज्य शासन ई-प्रशासनाबाबतचे सेवा कार्यक्रम आणि कार्यपध्दतीमध्ये मराठी हिच प्रथम आणि अनिवार्य भाषा म्हणून प्रस्थापित करेल जेणेकरून ई-प्रशासनाच्या सुविधांचा लाभ सर्व नागरिकांना होईल.

६.२ माहितीच्या देवाणघेवाणीसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करुन मराठी ही इंग्रजीबरोबर वापरली जाईल.

६.३ संगणकासाठी मराठीचा वापर करतांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मानकांचा अवलंब करण्यात येईल आणि त्यासाठी महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली मानके जसे युनीकोड, ओपन फॉर्म फॉरमॅट, कॉमन लोकल डेटा रिपॉझीटरी (सीएलआरडी), लेक्सीकॉन स्टॅन्डर्डडायझेशन यांचा अवलंब करण्यात येईल.

६.४ राज्यात संगणकासाठी राज्य शासनाने ठरवुन दिलेल्या विशिष्ट मानकांवर आधारीत कीबोर्डचा वापर करण्यात येईल. संगणकीय मजकूर मराठी भाषेत तयार करण्यास प्रोत्साहन देण्यात येईल.

## ७ संगणकाव्दारे सेवा पुरविण्याची कार्यपध्दती

७.१ केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवुन राज्यशासनाकडून ई-प्रशासनाच्या विविध प्रकल्पांसाठी अत्याधुनिक पध्दतीच्या संगणकीय संरचनेचा वापर केला जाईल.

७.२ राज्य शासनाचा प्रत्येक विभाग नियोजित कालावधीत ज्या नागरी सेवा ऑनलाईन द्यावयाच्या आहेत अशांची एक यादी तयार करेल आणि त्या विभागाचे ई-प्रशासन प्रकल्प माहिती तंत्रज्ञान विभागाच्या सल्यानुसार नियोजित पध्दतीने कार्यान्वित केले जातील.

७.३ सेवांच्या यादीत माहितीची उपलब्धता, अर्जाची थेट संगणकावर (Online) देण्याची सोय, थेट संगणकावर आर्थिक व्यवहार आणि त्याच्या पध्दती, थेट संगणकावरच अर्जाची तपासणी, थेट संगणकावरच अर्जाच्या सद्यःस्थितीबाबत माहिती आणि सेवांची थेट संगणकावर उपलब्धता यांचा समावेश असेल. या सेवा मराठी भाषेतच देण्यावर विशेष भर असेल.

७.४ राज्य शासन खात्री करेल की, ई-प्रशासनाच्या सर्व प्रकल्पांबरोबरच कार्यपध्दतींची पुनर्रचना केली जाईल आणि त्यासाठी चेंज मॅनेजमेंट सिस्टिमचा अवलंब केला जाईल. ई-प्रकल्पास मान्यता देतांना अंमलबजावणीतील सुटसुटीतपणा व बिझिनेस प्रोसेस इंजीनिअरींग बाबत अंमलबजावणी समिती व उच्चाधिकार समितीमध्ये निर्णय घेवुन आवश्यक निर्देश देण्यात येतील.

७.५ राज्य शासन सर्व ई-प्रशासनाच्या प्रकल्पांमध्ये खुल्या मानकांचा वापर (Open Standards) आणि परस्पर सहचर्यक्षमता असणे अनिवार्य करेल.

७.६ प्रकल्प अंमलबजावणी समिती, उच्चाधिकार समिती समोर विचारार्थ ठेवण्यात येणाऱ्या प्रकल्पामध्ये बिझीनेस प्रोसेस रीइंजीनिअरींग, मानके (Standards) व त्याची युआयडी सोबत संलग्नता इत्यादी करिता चेकलिस्ट माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत तयार करण्यात येईल व प्रकल्प मंजूरीसाठी या सर्व बाबी तपासणे अनिवार्य असेल.

७.७ सर्व प्रकारच्या संगणकीय चाचण्या घेण्याची सुविधा तसेच विविध स्तरांतील प्रशासकिय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची सोय असलेले ई-प्रशासन केंद्र स्थापन करण्यात येईल.

७.८ राज्य शासन ज्ञान व्यवस्थापन सुविधेची स्थापना करेल, जे राज्यातील सर्व ई-प्रशासन प्रकल्पांच्या कागदपत्रांची देखभाल करेल, ज्यात डीपीआर, आरएफपी, निविदापूर्व हरकती, कंत्राटे व अशी इतर कागदपत्रे असतील. त्याच प्रमाणे विविध प्रकल्पांचे अनुभव आणि खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाच्या प्रकरणांचा अभ्यागतांचा अहवाल उत्तम पध्दतीचे दस्ताऐवजीकरण करेल.

७.९ शासनाच्या सर्व विभागांमधील हार्डवेअर आणि सॉफटवेअरची संपूर्ण ऑनलाईन इन्व्हेटरी बनविण्यात येईल.

७.१० विविध विभागांमध्ये हार्डवेअर आणि सॉफटवेअर एकत्रित मिळून वापरण्याच्या आणि त्यांच्या पुनर्वापराच्या शक्यता अजमावण्यात येईल. विशेषत: एमआयएस, जीआयएस, बीआय टुल्स, राज्य डाटा केंद्रामध्ये सर्व्हर्सचा आप-आपसातील वापर(Shairing of Servers), क्लाउड काम्प्युटिंग, वेबडिझायनींग, होस्टींग, सेक्युरीटी, WAG(Web Accessibility Guidelines) कम्प्लायन्स इत्यादी बाबींसाठी एकत्रित काम करण्याचा विशेष प्रयत्न केला जाईल.

७.११ ई-प्रकल्पात निर्णय घेण्यासाठी साह्यभूत ठरतील अशा माहितीची साठवण करण्याची व त्यातून निर्णय प्रक्रीया सुधारण्यासाठीची सुविधा निर्माण करण्यात येईल.

७.१२ विविध शासकीय संस्था एकामेकांच्या माहितीचा वापर समांतर व उभ्या पध्दतीने करण्यावर भर दिला जाईल आणि त्यामध्ये कामाची पुनरुक्ती होऊ नये म्हणून अशा माहितीची एका ठिकाणी साठवण करण्याची सुविधा (Data Inventory) निर्माण केला जाईल. या इन्व्हेटंरीचा वापर शासनाच्या महसुलामध्ये होणाऱ्या गळतीला आळा बसण्यासाठी करण्यात येईल.

७.१३ कोणत्याही ई-प्रशासन प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता प्रथम क्लाउड कम्प्युटींगच्या पर्यायाची शक्यता आजमावुन घेण्यात येईल.

७.१४ डेटा स्टॅन्डर्ड आणि डेटा स्ट्रक्चर व त्यांचे नमुने माहिती तंत्रज्ञान विभागाकडून मान्य करण्यात येतील अथवा नव्याने निर्माण करण्यात येतील, ज्यायोगे प्रकल्पांमध्ये परस्पर सहकार्यक्षमता असेल. सर्व विभागाच्या मास्टर डाटा फॉरमेटची जबाबदारी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाची राहील.

७.१५ माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत ई-प्रशासन संबधी डेटा स्टॅन्डर्डडायझेशन, आर्किटेक्चर आणि पुनर्वापर इत्यादी संदर्भात मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येतील.

७.१६ कोणत्याही ई-प्रशासन प्रकल्पातून निर्माण होणारी माहिती, राज्यशासनाकडे नागरिकांबाबत असलेला डेटा, शासकीय आर्थिक बाबींविषयी उपलब्ध असणा-या सर्व माहितीची मालकी राज्य शासन किंवा राज्य शासनाच्या संबंधित विभागाकडे आणि संस्थांकडेच राहिल आणि विविध कायद्यांच्या तरतूदीनुसार अशी माहिती शासनाच्या इतर विभागांना किंवा कंत्राटदारांना देण्यात येईल.

७.१७ सर्व ॲप्लीकेशन्स वेब पोर्टल्स आणि नेटवर्क हे राज्यातील ई-प्रशासन प्रकल्पाबाबतचा भाग असतील. त्यासाठी केंद्र शासन आणि राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली सुरक्षा विषयक प्रमाणपत्रे अनिवार्य असतील. राज्य शासन नागरिकांसंबंधीची माहिती गोळा करताना अशा माहितीची संपूर्ण सुरक्षा आणि गोपनीयतेची संबंधित कायद्यांच्या तरतुदीनुसार पूर्ण काळजी घेईल. कंत्राटदारांशी करार करतांना करारनाम्यामध्ये या तरतुदीचा अंतर्भाव करण्यात येईल.

७.१८ सर्व माहिती प्रमाणित युनिकोडच्या सुयोग्य अशा नमुन्यातच असेल. यापुर्वी युनिकोडमध्ये नसलेली माहिती येणाऱ्या ठराविक कालावधीत पुर्णपणे युनीकोडमध्ये रूपांतरित करण्यात येईल.

७.१९ सर्वसाधारण प्रमाणित स्पॅशियल डाटा (Spatial Data) निर्माण करणे अग्रक्रमाचे असेल .

७.२० राज्य शासन सर्व सार्वजनिक आणि शासकीय खरेदी विक्रीच्या व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी प्रमाणित अशा ई-प्रोक्युअरमेंट प्रक्रियेचा अवलंब करेल.

७.२१ शासकीय विभागातील संगणकीकरण प्रक्रियांमध्ये विश्वासार्हता आणण्यासाठी संगणकीय स्वाक्षरीची (Digital Signature) पध्दत स्वीकारली जाईल.

७.२२ सर्व कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक हजेरीची पध्दत अनिवार्य राहिल.

७.२३ शासकीय कामकाजात गतिमानतेसाठी सर्व विभागीय आणि क्षेत्रिय कार्यालयांकडून संगणकीय कागदपत्रे आणि कामकाज व्यवस्थापन प्रणाली (Document and Workflow Management System) अनुसरली जाईल. ईलेक्ट्रॉनिक डेटा (ई-मेल, दस्ताऐवज, ई-फाईल, स्कॅन केलेली कागदपत्रे आणि डेटाबेस इत्यादी) जतन करण्यासाठी आंतरराष्ट्रिय धर्तीवर नियम केले जातील.

७.२४ राज्य शासन सर्व जुने अभिलेखे आणि नस्त्यांचे संगणकीकरण करेल आणि थेट संगणकावरच असे अभिलेखे आणि नस्त्या साठवणे आणि शोधता येणे शक्य व्हावे अशा पध्दती सुरु करेल.

७.२५ राज्य शासनाच्या सर्व विभागांमध्ये आणि लोकप्रतिनिधी यांच्यामध्ये परस्पर संवादासाठी संगणकीय ई-मेल्सचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

७.२६ अनधिकृत सॉफटवेअरचा वापर कोणत्याही शासकीय विभागात किंवा कार्यालयात पूर्णपणे निषिध्द असेल. यासाठी कार्यालय प्रमुखाला जबाबदार धरण्यात येईल.

७.२७ कमी खर्चात व कमी वेळामध्ये प्रकल्प राबविण्यासाठी ई-प्रशासनाच्या प्रकल्पांमध्ये खाजगी क्षेत्राशी भागीदारीत काम करण्याला प्रोत्साहन दिले जाईल.

७.२८ महाराष्ट्र शासनासाठी खास बनविलेल्या सॉफटवेअरच्या मूळ प्रतीवर (Source Code) आणि आयपीआर वर शक्य तेथे राज्य शासनाचीच मालकी राहिल आणि अशा संगणक प्रणालीच्या भागांचा पुनर्वापर राज्य शासनाच्या सर्व प्रकल्पांसाठी व्हावा याला खास प्रोत्साहन दिले जाईल. जेव्हा एखादया प्रकल्पावरील पुर्ण खर्च मनुष्य आधारित किंवा निविदा माध्यमातुन अदा करण्यात आलेला असेल तेव्हा सोर्स कोड आणि आयपीआर हा राज्यशासनाच्या मालकीचा असणे अनिवार्य राहिल. सर्व प्रकल्पात बिझनेस कंटीन्युटी प्लॅनचा समावेश असेल.

७.२९ ज्या ई-प्रशासन प्रकल्पाच्या आज्ञावलीतून राज्यास उत्पन्न मिळू शकेल अशा आज्ञावतीची विक्री/वापर करुन एकुण उत्पन्नापैकी शासनाने निश्चित केलेला वाटा आयपीआर/प्रॉडक्ट विकसित करणाऱ्या सिस्टिम ईन्टीग्रेटरला देण्यात येईल व त्याचा उल्लेख निविदा दस्ताऐवजात करण्यात येईल.

७.३० केंद्र शासनाने किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर ई-प्रशासनाच्या मानकासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या आधारे राज्य शासन आवश्यक ते मार्गदर्शक तत्वे निर्गमित करेल व सर्व ई-प्रकल्प राबवितांना ही तत्वे पाळणे बंधनकारक असेल.

## ८ सेवा प्रदान करण्याचे मार्ग

८.१ शासन नागरिकांना विविध सेवा घरपोच मिळण्यासाठी सेवा प्रदान करण्याचे विविध मार्ग उपलब्ध करेल.

८.२ केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पोर्टलच्या धर्तीवरच असलेल्या राज्य शासनाच्या पोर्टलवर सर्व नागरी सेवा थेट उपलब्ध केल्या जातील तसेच त्या महा ई-सेवा केंद्र, सेतु, सीएफसी, मोबाईल इत्यादीसारख्या माध्यमातुन नागरीकांना उपलब्ध केल्या जातील.

८.३ सर्व शासकीय विभागाची संकेतस्थळे आणि पोर्टल राज्य शासनाच्या संकेतस्थळाशी जोडलेली असतील. या सर्व संकेतस्थळांवर साधारण देखरेख करण्याची यंत्रणा विकसित करण्यात येईल.

८.४ राज्य शासनाचे पोर्टल सर्व नागरिकांना उपलब्ध राहील.

८.५ संकेतस्थळासंबधी केंद्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांची पूर्तता राज्य शासनाकडून तयार करण्यात येणाऱ्या संकेतस्थळ/वेबॲप्लिकेशनची निर्मिती करतांना केली जाईल. हे संकेतस्थळ व वेबॲप्लीकेशन विविध ब्राउझर आणि ऑपरेटींग सिस्टिवर काम करू शकेल तसेच त्यास सुरक्षेचे योग्य ते प्रमाणपत्र असेल. तसेच वेब ॲक्सेसिबिलिटीसंबधी मार्गदर्शक तत्व (Version२, Level A) ची पुर्तता करेल.

८.६ नागरिकांना सेवा प्रदान करण्यासाठी मोबाईल फोनवर आधारित ॲप्लिकेशन्स, कॉल सेंटर्स, आयपीटीव्ही अशा अनेकविध मार्गांचा वापर करण्यास राज्य शासन प्रोत्साहन देईल.

८.७ राज्यामध्ये एम-प्रशासनाला (Moblile-Governance) प्रोत्साहन देणे हा शासनाचा प्रयत्न राहील.त्या करिता शासन योग्य ते मानके आणि एसएमएस, मोबाईल सर्वीस गेटवे, मोबाईल ॲप्लीकेशन इत्यादी पायाभूत सुविधांची निर्मिती करेल. विशेषत: गाव पातळीवरील माहिती घेण्यासाठी मोबाईल आधारीत यंत्रणा प्रथमत: विकसित करुन वापरण्यात येईल. मोबाईल संदेश सावधानतेचा इशारा देण्यासाठी आणि माहितीच्या देवाण-घेवाण करीता वापर केला जाईल.

८.८ ई-प्रशासनाबाबत नागरिकांना माहिती देण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल व याकरिता आवश्यक ती काळजी घेऊन सोशल नेटवर्कींगचा वापर करण्यात येईल.

## ९. सेवा प्रदानता व्दार ( सर्व्हिस डेलिवरी गेटवे )

९.१ राज्य शासनाचे पोर्टल आणि ई-प्रशासनाचे विविध संगणकीय कार्यक्रम यामध्ये संगणकीय माध्यम म्हणून राज्य शासन एक सेवा प्रदानता द्वार ( स्टेट सर्व्हिस गेटवे ) निर्माण करत आहे, जे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सेवा प्रदानता द्वार या प्रमाणेच असेल.

९.२ सेवा प्रदानता द्वार हे सेवा देणारे आणि सेवा घेऊ इच्छिणारे यांच्यामधील संवादासाठी मध्यवर्ती केंद्र असेल.

९.३ महसुली जमा, खर्च, परतावा आणि मोबाईलवर आधारित पेमेंट सेवा पुरवण्याकरिता पेमेंट गेटवे माहिती तंत्रज्ञान विभागाकडून कोषागारे आणि वित्त विभागाच्या सहकार्याने विकसित करण्यात येईल.

९.४ माहिती तंत्रज्ञान विभाग तंत्रज्ञानाचा वापर, मोबाईल तंत्रज्ञानाव्दारे देयके आणि अधिप्रमाणिकता करण्यासहित, वित्तीय समावेशनासाठी (Financial Inclusion साठी) प्रोत्साहन देईल. त्यासाठी राज्य/केंद्र शासनाचा वित्त विभाग, युआयडीएआय आणि अन्य वित्तीय संस्थांचे सहकार्य घेण्यात येईल.

## १० महाराष्ट्र सार्वजनिक सेवा अनिवार्य इलेक्ट्रॉनिक प्रदानता (MMEDPS) अधिनियम

१०.१ नागरिकांना संगणकीय पध्दतीने सेवा देण्यासाठी महाराष्ट्र शासन सार्वजनिक सेवा अनिवार्य इलेक्ट्रॉनिक प्रदानता अधिनियम अस्तित्वात आणेल ज्या अन्वये सर्व शासकीय कार्यालये आणि विभागांना विशिष्ट नागरी सेवा ऑनलाईनद्वारे थेट सेवा देणे सक्तीचे राहिल.

१०.२ या अधिनियमाद्वारे प्रत्येक नागरिकाला या सेवा थेट संगणकावर (ऑनलाईन) घेता येण्याचा पर्याय उपलब्ध असेल.

१०.३ सर्व शासकीय विभाग पूर्व निश्चित कालावधीमध्ये विविध माहितीचे नमुने, परवाने, प्रमाणपत्रे, मंजुरीपत्र, पैसे भरणे व त्याची रिसीट, अर्ज भरणे, अर्जाच्या सद्य:स्थितीची तपासणी, इत्यादी सर्व व्यवहार थेट संगणकावर (ऑनलाईन) करतील.

१०.४ सर्व शासकीय विभागांना त्यांच्याकडून ऑनलाईन पध्दतीने देण्यात येणाऱ्या सेवा जाहीर करणे हे या कायद्यान्वये अनिवार्य असेल.

## ११ आवश्यक पायाभूत सूविधा

११.१ महाराष्ट्र शासनाचे वाईड एरिया नेटवर्क (MSWAN)ने राज्याचे मुख्यालय सर्व विभागीय मुख्यालये, सर्व जिल्हा मुख्यालये, सर्व तालुका मुख्यालये, सर्व प्रमुख केंद्रे एकमेकांशी जोडले जातील आणि माहिती, आवाज आणि चलचित्रांच्या देवाणघेवाणीसाठी सुरक्षित महाजाल सुविधा पुरविण्यात येईल.

११.२ कार्यालयांना जवळच्या पीओपी पासून समांतर जोडणी पुरविली जाईल.

११.३ महाराष्ट्र शासनाचे वाईड एरिया नेटवर्क (MSWAN) द्वारे सरकारी कार्यालयांना व्हीपीएन ने जोडले जाईल.

११.४ आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्तीमध्ये तातडीच्या मदतीसाठी उपग्रहाद्वारे व्हीसॅटची यंत्रणा कार्यान्वित केली जाईल.

११.५ राज्य शासनाच्या प्रत्येक कार्यालयांमध्ये इंटरनेट जोडणारी सुविधा (इंटरनेट कनेक्टीव्हीटी) असेल, जी शक्य तेथे ब्रॉडबँड स्वरुपाची असेल (तार किंवा बिनतारी) राज्यशासनाची गावपातळीवरील कार्यालये नेटवर्कद्वारे जोडण्यात येतील.

११.६ शासकीय कामकाज परिणामकारक करणे आणि प्रवास खर्चात कपात करण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरसिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, व या सुविधेचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

११.७ संपूर्ण राज्यासाठी शासन ते नागरिक (G२C), शासन ते व्यवसायक्षेत्र (G२B), शासन ते शासन (G२G), शासन ते कर्मचारी(G२E) आणि अशा सर्व सेवांसाठी स्टेट डेटा सेंटर (SDC) उभारले जाईल.

११.८ स्टेट डेटा सेंटर व्यतिरिक्त आवश्यकता भासल्यास राज्य शासन इतर खाजगी/सार्वजनिक क्षेत्रातील डेटा सेंटरच्या सुविधा पुरविण्या-या संस्थांकडून सेवा घेईल.

११.९ डेटा सेंटर शासनाच्या विविध विभागांना आपली सर्व्हर सुविधा ठेवण्याकरिता, आज्ञावल्यांना जागा उपलब्ध करुन देण्याकरिता, डेटा सेंटरचे व्यवस्थापन करण्याकरिता, आपत्कालिन परिस्थितीत माहितीचा पुनर्लाभ करणे, माहितीच्या प्रती तयार करणे यासारख्या सुविधा प्रदान करेल.

११.१० सर्व सेवा विनंत्यांना त्वरित प्रतिसाद देता यावा याकरिता डेटा सेंटरमध्ये पुरेशी बँडविड्थ क्षमता असेल याची काळजी घेतली जाईल.

११.११ डेटा सेंटरमध्ये आपत्ती आल्यास सर्व माहितीचा पुनर्लाभ आणि कामकाज विनाअडथळा सुरु रहावे यासाठी पुरेशी आपत्कालीन माहिती पुनर्लाभ प्रणाली ठेवली जाईल.

११.१२ ग्रामीण विभागासह राज्याच्या सर्व भागात अतिजलद संगणकीय महाजाल सेवा सुविधा (हाय-स्पीड ब्रॉडबॅन्ड इंटरनेट) मिळण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असेल.

११.१३ आयसीटी यंत्रणेमध्ये पर्यावरणाला अनुकूल (Green IT) अशा माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर मुख्य भर असेल.

## १२ माहिती तंत्रज्ञान उत्पादने आणि सेवा मिळवण्याबाबत

१२.१ राज्यामध्ये विविध ई-प्रशासन प्रकल्प शिफारस केलेल्या संरचनेनुसार कार्यान्वित करण्यासाठी पर्यावरणस्नेही माहिती तंत्रज्ञान डोळयासमोर ठेवून योग्य ते हार्डवेअर, सॉफटवेअर आणि सेवा मिळविणे आवश्यक आहे.

१२.२ खरेदी प्रक्रियेत दर्जेदार पुरवठादारांनी सामील व्हावे यासाठी या निविदांना योग्य ती प्रसिध्दी देणे आणि निविदा कागदपत्रे संभाव्य पुरवठादारांना सहजरित्या उपलब्ध असणे अत्यंत महत्वाचे आहे.

१२.३ प्रत्येक शासकीय विभाग आपल्या विभागांची प्रकल्प अंमलबजावणी समिती (पीआयसी) स्थापन करेल, जी विभागाच्या सर्व ई-प्रशासन प्रकल्पांवर देखरेख करेल. या समितीत नियोजन, अर्थ, उद्योग आणि माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रतिनिधी मूळ विभागाच्या प्रतिनिधींसमवेत समाविष्ट असतील.

१२.४ प्रकल्प अंमलबजावणी समितीत तो विभाग आवश्यकता भासल्यास एनआयसी चे सभासद किंवा माहिती तंत्रज्ञान आणि ई-प्रशासन क्षेत्रातील बाहेरचे नामांकित तज्ञ सदस्य म्हणून घेऊ शकेल.

१२.५ माहिती तंत्रज्ञानाची सर्व उत्पादने आणि सेवा मिळविताना प्रकल्प अंमलबजावणी समिती किंवा उच्चाधिकार समिती जिचे प्रमुख मुख्य सचिव असतील, यांची मान्यता घेतली जाईल.

१२.६ माहिती तंत्रज्ञानाची उत्पादने किंवा सेवा घेताना संबंधित सीव्हीसी मार्गदर्शक तत्वे पाळणे आवश्यक असेल.

१२.७ दहा लक्ष रूपयापेक्षा जास्त आणि रूपये पाच कोटीपेक्षा कमीच्या सर्व निविदा प्रकल्प अंमलबजावणी समितीने आणि पाच कोटी रूपयांवरील सर्व निविदा उच्चाधिकार समितीने तपासून मंजूर करणे आवश्यक आहे.

१२.८ सर्व निविदा (आणि त्यातील दुरूस्त्या) महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) किंवा राज्याच्या संगणकीय निविदा संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

१२.९ संभाव्य पुरवठादारांना आपली बोली (Bid)लावण्याकरीता किमान २ आठवडयांचा किंवा राज्य शासनाने विहित केलेल्या खरेदीच्या धोरणानुसार कालावधी दिला जाईल.

१२.१० ज्यावेळी मर्यादित निविदा मागविण्यात आल्या असतील अशा वेळी फक्त मध्यवर्ती मान्यताप्राप्त कंत्राटदारांनाच भाग घेता येतो, अशा कंत्राटदारांना किमान ७ दिवसाचा कालावधी आपली बोली (Bid) लावण्यास देण्यात येईल.

१२.११ विशिष्ट मालकीच्या उत्पादनांसदर्भात मान्यताप्राप्त पुनर्विक्रेत्यांसाठी (विशिष्ट पात्रताधारक) मर्यादित निविदा उपलब्ध केल्या जाऊ शकतील आणि राज्य शासन अशा वेळी सर्वात कमी किंमत लावणा-या कंत्राटदारांबरोबर वाटाघाटी करून सर्वोत्तम किंमत मिळवू शकेल.

१२.१२ निविदा प्रक्रियेचा निर्णय राज्य शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) किंवा राज्याच्या संगणकीय निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल. पुरवठा/इन्स्टॉलेशन/ कमिशनिंग/ वॉरंटी इत्यादी ऑनलाईन ठेवले जातील आणि ते ऑनलाईन पध्दतिने माहिती तंत्रज्ञान विभागाच्या इन्व्हेन्टरीला जोडले जातील.

१२.१३ उपरोक्त तरतुदीत जरूर तेथे प्रकल्प अंमलबजाणी समिती (PIC) किंवा उच्चाधिकार समिती योग्य ती कारणे नोंदवून सवलती देऊ शकेल.

१२.१४ राज्य शासन हार्डवेअर आणि सॉफटवेअर उत्पादनांसाठी, नेटवर्क उपकरणांसाठी, प्रशिक्षण तसेच क्षमता निर्माण करण्यासाठी, सल्लागार नेमण्यासाठी आणि ई-प्रशासनाच्या प्रकल्पात संगणक प्रणाली तज्ञ नेमण्यासाठी ठराविक कालावधीसाठी दरकरार कंत्राटे ठरवेल.

१२.१५ असे दरकरार सर्व विभागांना वापरणे शक्यतो बंधनकारक असेल. परंतु काही अपवादात्मक परिस्थीतीत त्यांना स्वतंत्र निविदा मागविता येतील. (जागतिक बँकेचे पुरस्कृत प्रकल्प किंवा विशिष्ट तांत्रिक गरजेकरिता), तथापी त्यास प्रकल्प अंमलबजावणी समिती / उच्चाधिकार समितीची मान्यता आवश्यक असेल.

१२.१६ सर्व मंडळे महामंडळे त्यांना विहित केलेल्या वित्तीय नियमावलीचा अवलंब करतील तथापि विभागाचे सचिव सर्व माहिती तंत्रज्ञान प्रकल्पाचा वेळोवेळी आढावा घेतील.

१२.१७ राज्य शासनाचे विभाग खालीलपैकी कोणत्याही मार्गाने ई-प्रशासन अंमलबजावणी करू शकतील.

१२.१७.१ विभाग मान्यताप्राप्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या यादीतील एक प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमू शकेल किंवा तशी यादी उपलब्ध नसेल तर खुल्या निविदा प्रक्रीयेतून असा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमू शकेल जो त्या विभागाला प्रकल्पाच्या पुढील सर्व बाबतीत मदत करेल.

१२.१७.२ विभाग गरजेनुसार मनुष्यबळ किती लागेल याचे अंदाजपत्रक बनवून त्यास माहिती तंत्रज्ञान विभागाची मान्यता घेईल व मंजूर दरकरारच्या आधारे ई-प्रशासनाच्या प्रकल्पासाठी मनुष्यबळ नेमू शकेल.

१२.१७.३ प्रकल्पाकरिता विभागास खुल्या निविदेच्या माध्यमातुन सॉफ्टवेअर एजन्सी/सिस्टीम ईन्टीग्रेटरची नियुक्ती करता येईल.

१२.१७.४ विभाग ई-प्रशासन प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या "सेतू संस्थेला" त्यांनी दिलेल्या अंदाजपत्रकाचा विचार करून नेमू शकेल.

१२.१८ राज्य शासन विविध ई-प्रशासन प्रकल्पांमध्ये छोटया आणि मध्यम उद्योगांना तसेच स्थानिक व्यावसायिकांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे मार्ग अवलंबेल.

## १३. क्षमता उभारणी

१३.१ राज्य शासन महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सेवा (MITS) या नांवाने माहिती तंत्रज्ञान संवर्गाची निर्मिती करेल.

१३.२ राज्यात कोणत्याही विभागात ई-प्रशासनाच्या अंमलबजावणीच्या मदतीकरिता एमआयटीएस चे अधिकारी माहिती तंत्रज्ञान विभागाकडून नियुक्त केले जातील.

१३.३ कोणताही विभाग उपलब्ध असलेली समकक्ष पदे प्रत्यार्पित करुन MITS चे अधिकारी त्या पदावर नियुक्त करु शकेल.

१३.४ अशी रिक्त पदे प्रत्यार्पित करण्याविषयीची शिफारस माहिती तंत्रज्ञान सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती करू शकेल. ज्या समितीत मूळ विभागाचे सचिव, वित्त विभागाचे सचिव व एनआयसी चे प्रतिनिधी असतील.

१३.५ अशा प्रकारे पदे प्रत्यार्पित केल्यामुळे रिक्त पदी एमआयटीएसचे अधिकारी नेमण्याच्या अंतिम शिफारशीला मंजूरी देण्याचे अधिकार मुख्य सचिव अध्यक्ष असलेल्या उच्चाधिकार समितीला असतील.

१३.६ माहिती आणि संगणक तंत्रज्ञानातील कौशल्य वाढविण्याचे आणि शासकीय अधिका-यांत या क्षमता निर्माण करण्याचे प्रशिक्षण राज्य शासनातर्फे उपलब्ध करुन दिले जाईल.

१३.७ राज्य शासन आपल्या व्यवस्थेतच ई-प्रशासनाचे आणि व्यवसाय बदलाचे प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी आपल्या मनुष्यबळाला प्रशिक्षण देऊन तसेच आवश्यक पायाभूत सुविधा आणि यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देऊन जरुर त्या क्षमता निर्माण करण्याचे प्रयत्न करेल.

१३.८ प्रशिक्षण कार्यक्रमासाठी उपलब्ध कर्मचा-यांची सध्याची कौशल्ये आणि भविष्यकालीन गरजांच्या आधारे गटवारी केली जाईल आणि मग त्यांना शासकीय आणि अशासकीय संस्थामध्ये आणि खासगी संस्थामधे भारतात किंवा परदेशात प्रशिक्षण दिले जाईल.

१३.९ क्षमतांच्या उभारणीसाठी खाजगी आणि सरकारी भागीदाराला प्रोत्साहन दिले जाईल.

१३.१० राज्य शासन आपल्या कर्मचा-यांना ई-प्रशासन क्षेत्रातील प्रशिक्षण कार्यक्रमात भाग घेण्यासाठी प्रोत्साहीत करेल.

१३.११ संगणक आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात पदविका, पदवी अथवा पदव्युतर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना शासनाच्या विभागांच्या विविध ई-प्रशासन प्रकल्प आणि कार्यक्रमात प्रत्यक्षानुभव घेण्यासाठी इंटर्नशिपची संधी प्रशासन निर्माण करेल आणि अशा विद्यार्थ्यांना या कामानंतर योग्य ते प्रशिस्तपत्र व विद्यावेतन दिले जाईल.

१३.१२ सार्वजनिक व खाजगी भागिदारीद्वारे (PPP) राज्य शासनाशी संबंधित असलेल्या विविध कंपन्यांना अशा प्रकारे विद्यार्थी प्रत्यक्षानुभवासाठी पाठविण्यास प्रोस्ताहन दिले जाईल.

१३.१३ खासगी संस्थेमधील कुशल व जाणकार अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या खासगी संस्थेतील सेवेवरील हक्क अबाधित ठेवून किंवा प्रतिनियुक्तीवर नियुक्त करण्याची संधी शासन उपलब्ध करुन देईल.

## १४. भागीदारी, संयुक्त संस्था आणि सहयोग करार

१४.१ महाराष्ट्र शासनाने टिसीएस या कंपनीबरोबर एकत्र येऊन १० वर्ष कालावधीसाठी एक संयुक्त संस्था स्थापन केली आहे. या संस्थेत महाराष्ट्र शासन व टिसीएस कंपनी यांचे अनुक्रमे २६:७४ या प्रमाणात समभाग आहेत. ही कंपनी राज्यात ई-प्रशासनाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी इलेक्ट्रॉनिक डॉक्युमेंट ॲन्ड वर्कफलो मॅनेजमेंट सिस्टिम आणि राज्य शासनाचे ऑन लाईन पोर्टल याबाबतीत काम करेल.

१४.२ सामंजस्य करारानुसार राज्यशासनाचा संयुक्त उपक्रम असलेली कंपनीला देखील शासनाच्या ई-प्रशासन प्रकल्प राबविण्यासाठी काम करता येईल.

१४.३ राज्य शासन राज्यात ई-प्रशासनाला प्रोत्साहन देण्यासाठी एनआयसी, सी-डॅक, यासारख्या संस्थांबरोबर संयुक्तरित्या प्रयत्न करण्याला विशेष प्रोत्साहन देईल आणि अशा प्रयत्नात त्यांचा सहभाग घेण्यात येईल.

१४.४ राज्य शासन उच्चश्रेणीच्या माहिती तंत्रज्ञान आणि दुरसंचार संस्थाशी संयुक्त उपक्रम/खासगी-सार्वजनिक भागीदारी/सामंजस्य करार करण्याच्या दृष्टीने विचार करेल व या अनुषंगाने अद्यावत तंत्रज्ञान मिळवण्याकरिता संशोधन आणि विकासाचे प्रयत्न करेल. मराठी भाषा, जीआयएस, बीआय इत्यादीला चालना देण्याकरिता ॲप्लिकेशन विकसित करण्याचा तसेच देवाणघेवाण करण्याचा प्रयत्न करेल.

## १५ पुनर्विलोकन आणि परीक्षण

१५.१ राज्य शासन या ई-प्रशासन धोरणाच्या तरतुदींच्या पूर्ततेची तपासणी करण्यासाठी विविध विभागाचे नियमित परीक्षण करेल. (शासनाच्या नियंत्रणाखालील कार्यालये, महामंडळे, प्रकल्प, एसपीव्ही इत्यादी सहीत) आणि प्रकल्पाला मंजुरी देतांना विचारात घेतलेल्या उद्दीष्टांची पूर्तता केल्याची खात्री करेल. प्रकल्पामध्ये मध्यावर्ती दुरूस्त्या करण्याची शिफारस केली जाईल व या शिफारशीवर प्रकल्प अंमलबजावणी समितीत निर्णय घेण्यात येईल.

१५.२ सर्व ई-प्रशासन प्रकल्पांचा ते या धोरणानुसार आहेत की नाही आणि मानकांच्या आणि वैधतेच्या कक्षेत आहेत की नाही याबाबत नियमितपणे आढावा घेतला जाईल.

१५.३ राज्य शासनाच्या सर्व संकेतस्थळाचे नियमित सायबर सिक्युरिटी ऑडिट सक्तीचे असेल आणि डेटा सेंटरवर कोणतेही संकेतस्थळ, पोर्टल अथवा संगणकीय कार्यक्रम अशा सिक्युरिटी ऑडिटशिवाय कार्यान्वित करता येणार नाही.

१५.४ राज्य शासनाची सर्व संकेतस्थळे, पोर्टल आणि संगणकीय कार्यक्रम नियमितपणे अद्यावत केली जातील आणि नियमितपणे त्यांचे सुरक्षाविषयक परीक्षण केले जाईल.

१५.५ राज्य शासन सर्व विभागात या धोरणाच्या नियमित अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी एक समिती स्थापन करेल.

## १६. अंदाजपत्रकीय तरतूद

१६.१ राज्य शासनाचे सर्व विभाग आपल्या अंदाजपत्राच्या ०.५% रक्कम ई-प्रशासनासाठी आरक्षित करतील.

१६.२ टप्याटप्याने काही कालावधीत ही तरतूद ३% पर्यंत वाढवण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असेल.

१६.३ ई-प्रशासनासाठी आरक्षित अंदाजपत्रकीय तरतुदीचा मुख्य उद्देश नागरी सेवा संगणकावर पुरविणे आणि त्यासाठी लागणा-या सर्व पायाभूत सुविधा निर्माण करण्याकडे असेल.

१६.४ विविध विभागांनी ई-प्रशासनासाठी अर्थसंकल्पीत केलेल्या निधीमधून ठराविक निधी माहिती तंत्रज्ञान केंद्रीय निधीत जमा करण्यासाठी यंत्रणा निर्माण केली जाईल. या निधीतुन माहिती तंत्रज्ञान विभाग सर्व विभाग एकत्रित वापर करुन शकतील. अशा पायाभूत सुविधा (हार्डवेअर, सॉफटवेअर, होस्टींग,ऑडीओ-व्हिडीओ कॉन्फरन्स सुविधा इ.) निर्माण करेल.

१६.५ राज्यशासन विविध विभाग तसेच केंद्र व अन्य राज्यांचे विविध विभाग यांच्याशी संर्पक साधुन ब्रॉडबँन्ड युटीलायझेशन,ऑप्टिकल फायबर/वायरलेस रोलआउट, आयटी पार्क(सेझ सहित) इत्यादीमध्ये राज्यात गुंतवणुक करण्यासाठी जगभरातील तसेच भारतातील माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचार क्षेत्रातील कंपन्याना प्रोत्साहित करेल आणि त्यासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करेल.

## १७. अंमलबजावणीचे प्रशासन

१७.१ राज्यात ई-प्रशासनाच्या अंमलबजावणीचा विकास आणि देखरेख प्रभावीपणे व्हावी यासाठी जिल्हा पातळीपर्यंत प्रशिक्षित आणि तज्ञ कर्मचारीवर्ग असावा असा राज्य सरकारचा प्रयत्न असेल.

१७.२ ई-प्रशासन क्षेत्रात सक्रीय मदत करण्यासाठी राज्य शासन पुरेशा तज्ञ, सल्लागार आणि विशेष तज्ञांची मदत घेईल.

१७.३ राज्यात ई-प्रशासनाच्या अमंलबजावणीसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग समन्वयक विभाग म्हणुन काम करेल.

१७.४ राज्यात ई-प्रशासनाच्या अंमलबजावणीसाठी राज्यशासन पुरेशी आर्थिक तरतुद करेल.

१७.५ ई-प्रशासनाच्या यशस्वी अमंलबजावणीकरिता पारितोषिके देऊन प्रोत्साहन देणे, परिषदांचे आयोजन करणे यासारख्या माध्यमातून शासन प्रयत्नशील राहील.

१७.६ महत्वाच्या प्रकल्पांमध्ये इच्छित साध्य आणि परिणाम तपासण्याकरिता वेळोवेळी मुल्यमापन करण्यात येईल.

१७.७ राज्यातील रोजगार क्षमता वाढविण्यासाठी शासन -उद्योग - उच्चशिक्षण संस्था यांच्यामध्ये परस्परसंबंध वाढविण्यासाठी शासन विशेष प्रयत्न करेल.

हा शासन निर्णय या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येईल.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०११०९२२१५०४४४०१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.**

**(राजेश अगरवाल)**
**सचिव ( मातं)**

प्रत,

मा.राज्यपालांचे सचिव

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव

महालेखापाल-1( लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर

महालेखापाल-1( लेखापरीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई / नागपूर

उपमहासंचालक, विशिष्ठ ओळख प्राधिकरण क्षेत्रिय कार्यालय, मुंबई

अधिदान व लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई

निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई

शासनाचे मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव

विकास आयुक्त,उद्योग/ सर्व जिल्हाधिकारी / जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

सर्व महानगरपालिका आयुक्त

वित्त विभाग, कार्यासन अर्थसंकल्प-१४, मंत्रालय, मुंबई

निवड नस्ती कार्या-३९